Time : 2½ Hours

**MARATHI (T.L.)**

**Subject Code**

| S | 1 | 3 | 3 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 8)** **Maximum Marks : 80**

***सूचना :*** (*i*) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचा क्रमांक व उपप्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*iv*) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

1. (अ) पुढील प्रत्येक अपूर्ण विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत. त्यातील अचूक पर्याय पाठ्यपुस्तकाच्या आधारे निवडून अपूर्ण विधान पूर्ण करून पुन्हा लिहा :

(1) गाडेकाराने गाड्याच्या ब्रेकला बांधलेला दोर तुटला त्यामुळे .................. 1

(अ) गाड्याची दोन्ही चाके मोडली

(ब) गाडा उलटा पडला

(क) गाड्याचे रेडे जखमी झाले

(ड) गाडा जोरजोराने धावू लागला

(2) इंद्र राजा प्रल्हादाकडे गेला असता त्याला कळाले की .................... 1

(अ) राजा प्रल्हाद प्रजादक्ष आहे

(ब) जगात शील सर्वश्रेष्ठ आहे

(क) राजा प्रल्हाद कोणाचाही द्रोह करत नाही

(ड) राजा प्रल्हाद त्रैलोक्याचा धनी आहे

(ब) खालील उद्‌गार कोणी व कोणास उद्देशून काढले आहेत ते लिहा : 3

(1) ''कधी घरटं बांधताना पाहिलंस ?''

(2) ''नाव एकाचे होते पण लढाई जिंकली जाते ती संघवृत्तीमुळे''.

(3) ''मेलेलं माणूस कधी उभं राहील का ?''

(क) खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 3

(1) राजा प्रल्हाद कोणत्या कुळात जन्मलेला होता ?

(2) गाडेकाराचे घर कोठे होते ?

(3) पत्रकार व्यक्तीचे नाव काय होते ?

(4) गोपूच्या डोळ्यांत पाणी का उभे राहिले ?

(ड) खाली आपल्या पाठ्यपुस्तकातील एका धड्याचे नाव व कंसात लेखकांची नावे दिलेली आहेत. दिलेल्या धड्याच्या लेखकाचे नाव लिहा. 1

'महावीरचक्रधारी मेजर भास्कर रॉय'

(रा. ग. गडकरी, ग. प्र. प्रधान, रणजित देसाई)

2. (अ) खालील कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** ते **तीन** वाक्यांत लिहा : 4

(1) शीलावाचून मिळालेल्या संपत्तीचे कोणते फळ मिळते ?

(2) लेखक मारुती चितमपल्ली उदमांजराविषयी काय सांगतात ?

(3) येसाजीबरोबर पाटलांनी कोणता निरोप पाठवला ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **चार** ते **पाच** वाक्यांत लिहा : 6

(1) गोकूळने मथुरेस हाका मारण्याचा सपाटा का सुरु ठेवला ?

(2) लेखिकेने काश्मिरी मुलीला निसर्गकन्या का म्हटले आहे ?

(3) वामनराव बर्वे यांना 'वीर वामनराव' अशी उपाधी का देण्यात आली ?

3. (अ) पुढील अपूर्ण विधानाखाली दिलेल्या चार पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून ते विधान पूर्ण करून पुन्हा लिहा : 1

(1) विसरून जाय तेव्हा ............................ .

(अ) विक्राळ एक ज्वाला

(ब) प्राणांत गुंतवावा

(क) माणूस माणसाला

(ड) ठेवी जपून जीवा

(ब) तुमच्या पाठ्यपुस्तकातील कवितांच्या आधारे 'अ' गटात दिलेल्या काव्यांशाशी 'ब' गटात दिलेल्या काव्यांशाच्या पर्यायांपैकी योग्य पर्याय जोडून काव्यपंक्ती पुन्हा लिहा : 2

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (1) गई वाचण्याची | (अ) कसा आकांत मांडला |
| (2) आता डांबरच झाला | (ब) गई शोधण्याची |
| | (क) जन्म मरणाचा फेरा |
| | (ड) गई काजळाची |

(क) खालील कवितांच्या ओळीतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द घालून ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा : 2

(1) ढगांत धुराचा फवारा सोडून ........................... गाडी ती बोलली माजून.

(चेंदत, गर्जत, चेंगरत)

(2) देहाहुनी निराळी ............................... ओढ आहे.

(रक्तास, पाण्यास, तीर्थास)

4. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) संत नामदेवानी ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी कोणता मार्ग सांगितला आहे ?

(2) संत रामदास यांच्यामते हयगय केल्यामुळे काय होते ?

(3) रस्ता कोसळल्यामुळे काय घडले ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **तीन** ते **चार** वाक्यांत लिहा : 6

(1) संत तुकाराम 'मन करा रे प्रसन्न' या अभंगात परमार्थाची शिकवण कशी देतात ?

(2) कवी भा. रा. तांबे यांनी फुलपाखरांचे वर्णन कसे केले आहे ?

(3) समाजरूपी ईश्वराची पूजा कशी करावी असे कवी सांगतात ?

5. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्प्रचाराचा अर्थ लिहून त्या वाक्प्रचाराचा योग्य वाक्यात उपयोग करून लिहा : 2

(1) कृतकृत्य वाटणे

(2) भान न उरणे

(ब) खालील विधाने कंसातील सूचनेप्रमाणे लिहा :

(1) आई आंब्याच्या झाडाखाली थांबली होती. 1

(प्रयोग ओळखून लिहा)

(2) विंचवाच्या आकाराची लहान, वाकडी कट्यार. 1

(शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा)

(3) पक्ष्यांच्या मंझुळ कलरवानं आपोआपच जाग आला. 1

(वाक्य शुद्ध करून लिहा)

(4) स्वातंत्र्य आणण्यात तुमचाही हातभार लागला होता. 1

(वाक्य वर्तमानकाळात लिहा)

(क) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा : 2

मी हंसले <u>आणि</u> माझे <u>जुने</u> जोड तिला दिले.

(ड) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून लिहा :

(1) स्वप्न, राष्ट्र, लोखंड 2

(कोणत्याही **दोहों**ची विशेषणे बनवा)

(2) माणूस, महाग, नम्र 2

(कोणत्याही **दोहों**ची भाववाचक नामे बनवा)

(3) जमीन, डोळा, जंगल, 2

(कोणत्याही **दोहोंचे** समानार्थी शब्द लिहा)

(4) ज्ञान, सावकाश, मित्र 2

(कोणत्याही **दोहोंचे** विरुद्धार्थी शब्द लिहा)

6. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **अठरा** ते **वीस** ओळीत निबंध लिहा : 7

(1) समुद्रकिनाऱ्यावरील संध्याकाळ

(2) मजुराचे आत्मवृत्त

(3) माझा आवडता संत

(4) भ्रमणध्वनीचे (मोबाईलचे) दुष्परिणाम

(ब) खालील मुद्यांच्या आधारे सुमारे **दहा** ते **पंधरा** ओळीत गोष्ट लिहून तिला योग्य शीर्षक द्या : 5

उद्योगी गृहस्थ – मुलगे आळशी – वडिलांना चिंता – वडील आजारी – एक कल्पना – मुलांना बोलावणे – शेतात संपत्ती पुरुन ठेवणे – मुलांच्या कानात सांगणे – वडिलांचा मृत्यू – मुलांना पैशांची गरज – शेत खणणे – निराशा – बापाचा हेतू समजणे – मुलांना आनंद – योग्य शेवट.

7. (अ) भाऊ व बहीण यांच्यामध्ये झालेला संवाद **पाच** ते **सहा** ओळीत लिहा. 5

(ब) अरुण पाटील/अरुणा पाटील–गोकुळवाडी–साखळी गोवा हा/ही आपल्याला बाहेरगावी जाण्यासाठी परवानगी मागणारे पत्र वडिलांना लिहितो/लिहिते. या पत्राचा नमुना **दहा** ते **पंधरा** वाक्यांत लिहा. 5

8. (अ) ज्ञानज्योती विद्यालय, डिचोली गोवा येथे साजरा झालेल्या गोवा मुक्तिदिनाचा (19 डिसेंबर) वृत्तान्त खालील मुद्यांच्या आधारे **दहा** ते **बारा** वाक्यांत तयार करून लिहा : 5

गोवा मुक्तिदिन — प्रमुख पाहुणे कोण होते — त्यांचे स्वागत, परिचय कोणी करून दिला — ध्वजारोहण कोणाच्या हस्ते झाले — मुक्तिदिनावर आधारित गीते कोणी सादर केली — कोणते कार्यक्रम साजरे केले — प्रमुख पाहुण्यांच्या भाषणातील दोन मुद्दे — आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन कोणी केले.

(ब) पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

गुरुजींची 'श्यामची आई' म्हणजे कुमारांची जणू गीताच आहे. ज्याला 'साने गुरुजी' म्हणजे काय हे समजून घ्यायचे आहे. त्याने ''श्यामची आई'' पुनः पुन्हा वाचली पाहिजे, पारायणे केली पाहिजेत. प्रत्येक माता प्रेममयी असते व आपल्या मुलांसाठी ती कोणताही त्याग करायला मागे पुढे पाहत नाही आणि हेच तिचे खरे वैशिष्ट्य. गुरुजींची आई एक विलक्षण स्त्री रत्न असले पाहिजे. आभाळ फाटावे तसा त्या माऊलीचा संसार फाटत चालला होता, पण ती जिवाचे रान करून तो सावरू पाहत होती. घरात खायची ददात, धड वस्त्रांची टंचाई, पोराबाळांच्या शिक्षणाला दमडा नाही, पण श्यामची आई डगमगली नाही. आपल्या मुलांच्या मनाला उदात्त

संदुर वळण लावण्यासाठी ती आमरण झिजली. साने गुरुजींच्या जवळ जे जे काही सुंदर होते, देण्यासारखे होते, ते ते तिने त्यांना दिलेले होते.

**प्रश्न :**

(1) ज्याला 'साने गुरुजी' समजून घ्यायचे असतील त्याने काय केले पाहिजे ? 1

(2) प्रत्येक आईचे कोणते वैशिष्ट्य आढळते ? 1

(3) श्यामची आई आमरण कशासाठी झिजली ? 1

(4) साने गुरुजींच्या आईने त्यांना काय दिले ? 1

(5) उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा. 1